प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी हंगाम २०१६-१७ करीता पिक विमा हप्ता अनुदानाची रु.०२,१४,२०,२९१/- इतकी रक्कम कृषि आयुक्तालयास अदा करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो -२०१७/प्र.क्र.१२४/११ अे,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०८ डिसेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.२७/११अे, दि.२९.३.२०१७
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७
३) कृषि व पदूम विभाग पत्र क्र. प्रपिवियो - २०१७/प्र.क्र.१२४/११-अे, दि.२४.०८.२०१७
४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. प्रपिवियो/सां.८/रब्बी १६-१७/अनु/५७४/२०१७, दि.२५.१०.२०१७

प्रस्तावना -

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी हंगाम २०१६- १७ मध्ये नॅशनल इंशुरन्स कंपनीमार्फत राज्यात राबविण्यात आलेली आहे . रब्बी २०१६-१७ करीता पिक विमा हप्त्यामधील राज्य हिस्सा अनुदान रक्कम रु. २२,०५,८१,३३०/- इतकी होत असून त्यापैकी आत्तापर्यंत प्रथमत: रु.१२,९२,२१,८३०/- व तद्‌नंतर रु.६,९९,३९,२०९/- अशी एकुण रु.१९,९१,६१,०३९/- इतकी रक्कम कृषि आयुक्तालयाला उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आता भारतीय कृषि विमा कंपनीने उर्वरीत रु.२,१४,२०,२९१/- इतक्या रकमेची मागणी योजना राबविणाऱ्या नॅशनल इंशुरन्स कंपनीला देण्यासाठी केलेली आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये रु.१६५३.८० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

रब्बी हंगाम २०१६-१७ मधील भारतीय कृषि विमा कंपनीने मागणी केलेली रु.२,१४,२०,२९१/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत कृषि आयुक्तालयाने विनंती केली असून त्या अनुषंगाने रु.२,१४,२०,२९१/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी हंगाम २०१६-१७ मध्ये नॅशनल इंशुरन्स कंपनीमार्फत राज्यात राबविण्यात आलेली आहे. रब्बी २०१६-१७ मधील पिक विमा हप्त्यामधील राज्य हिस्सा अनुदान रक्कम रु. २२,०५,८१,३३०/- इतकी होत असून त्यापैकी आत्तापर्यंत दि.२९.०३.२०१७ च्या आदेशान्वये रु.१२,९२,२१,८३०/- व दि.२४.०८.२०१७ च्या आदेशान्वये रु. ६,९९,३९,२०९ /- असे एकुण रु.१९,९१,६१,०३९/- कृषि आयुक्तालयाला उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. आता रब्बी २०१६-१७ मधील पिक विमा हप्त्यामधील राज्य हिस्सा अनुदान रक्कम रु.२२,०५,८१,३३०/- मधील यापूर्वी वितरीत केलेली रु.१९,९१,६१,०३९/- **(रु.१२,९२,२१,८३० व रु. ६,९९,३९,२०९ /- = रु.१९,९१,६१,०३९/-)** इतकी रक्कम वगळता कृषि आयुक्तालयाने विनंती केल्यानुसार उर्वरीत रु. २,१४,२०,२९१/- इतकी रक्कम मासिक वित्तीय प्रणालीवर वितरीत करण्यास या आदेशान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त खर्च खालील लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ करिता मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा:

“मागणी क्रमांक डी - ३,
२४०१- पीक संवर्धन,
११०, पीक विमा
(००) (०८) प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत विमा हप्त्यासाठी अर्थसहाय (राज्य हिस्सा)
(२४०१ A६६४), (योजनेत्तर)”

३. सदरचा निधी वित्त विभागाच्या दि.१८.०४.२०१७ रोजीच्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वितरीत करण्यात येत आहे.

४. या प्रयोजनासाठी सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" तर कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०८१४५४२५५००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Balkrishna Pawaskar

Digitally signed by Sharad Balkrishna Pawaskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f4ebb91d526d59e93b9365fba816854d2dfa38e53ed59ae4b31ba8260ba52882, cn=Sharad Balkrishna Pawaskar
Date: 2017.12.08 15:00:38 +05'30'

(श.बा.पावसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
५. सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
७. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
८. वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई ३२
९. कक्ष अधिकारी (२ अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१०. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
११. सहसचिव/उप सचिव (११-अे/२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१२. विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, मुंबई.
१३. निवड नस्ती (कार्यासन ११अे)